मंगळवार, दि. ५ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३५९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# राज्यमंत्री बोर्डीकरांच्या विरोधात गुरुवारी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा मुकमोर्चा

## काळ्या फिती लावून निषेध

**जालना । प्रतिनिधी -** परभणीच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर यांनी सार्वजनिक कार्यक्रमात ग्रामपंचायत अधिकाऱ्याला अवमानास्पद वागणूक दिल्याचा निषेध करत, महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी जालना जिल्हा युनियनने आज काळ्या फिती लावून कामकाज करत निषेध नोंदवला. तसेच, ७ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मुकमोर्चा काढण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी आज सोमवारी (दि. ४ ऑगस्ट) जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांची भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन दिले. या निवेदनात स्पष्ट केले आहे की, राज्यातील ग्राम पंचायत अधिकारी ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून अत्यंत प्रामाणिकपणे काम करत आहेत आणि त्यांची कामगिरी राज्य व केंद्र शासनाद्वारे गौरवण्यात आली आहे.


मात्र, २ ऑगस्ट २०२५ रोजी परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात झालेल्या पंतप्रधान आवास योजना कार्यक्रमात, श्रीमती मेघना बोर्डीकर यांनी ग्रामपंचायत अधिकाऱ्याबाबत सार्वजनिकरित्या असभ्य व अपमानास्पद भाषा वापरून त्यांचे मनोबल खच्चीकरण करणारे वक्तव्य केले. याच प्रकाराचा निषेध करण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन डी.एन.ई १३६, जिल्हा शाखा जालना यांच्या वतीने पान २ वर

# युवकास मारहाण, गंभीर दुखापत; ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३१ जुलै २०२५ रोजी रात्री १० ते १०.३० वाजण्याच्या सुमारास एका युवकाला भररस्त्यात थांबवून मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी ७ जणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास हेड कॉन्स्टेबल शालुताई कचारू केदार करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मोहन सुनील भुरेवाल (वय २२, रा. गोपाळपुरा, बडी सडक, नवा जालना) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, चुलत भाऊ शिवम इंदरलाल भुरेवाल (वय २६ रा. कालीकुर्ती) व त्याचा मित्र प्रतिक कचरुलाल गौड हे दोघे सोबत वेगवेगळ्या MH14 HV 4289 आणि MH21 BR 6776 या क्रमांकाच्या मोटारसायकलवर सॅफ्रॉन हॉटेल ते छत्रपती शिवाजी महाराज चौकमार्गे कालीकुर्तीकडे घरी जात असतांना छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ लोकेश भगत व वंश भगत यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून शिवम व प्रतिक यांच्या मोटार सायकलला कट मारला. व त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर त्यांना काहीही न बोलता शिमला ज्युस सेंटर गाडीजवह कालीकुर्ती रोड जालना येथे येऊन थांबले असता लोकश भगत यांने शिवम यास शिवीगाळ केली. त्यानंतर शिवम यास लोकेश भगत यास तु आम च्या गाडीला कट मारुन शिवीगाळ का करत आहेत असे म्हणत असतांना वंश भगत यांने त्यांच्याकडील बुलेट मोटारसायकलला लावलेला लोखंडी रॉड काढून अंगावर धावून आला व म्हणाला रुको, तुमको बताता हूं, असे म्हणून बाजुला जावून कोणाला तरी फोन लावला. व काही वेळातच त्याच्या ओळखीचे हर्षल भगत, सुमीत आढे, सोन्या जाधव, दिपसिंग कलानी हे त्यांच्या हातात लाकडी दांडे व रॉड घेवून आले. त्यांनंतर हर्षल भगत यांने त्याच्या कंबरेला लावलेल्या धारदार चाकुने काही एक न बोलता शिवम भुरेवाल यांस जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याच्या पोटावर, गळ्यावर शरीरावर वार केले. वंश भगत यांने डोक्यावर शिवम भुरेवालच्या डोक्यावर रॉडने वार केला. तो पान २ वर

# पत्रकारांसाठी घरकुल आणि विमा सुरक्षेसह विविध योजनांवर बैठक संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील पत्रकार, तसेच वृत्तपत्र आणि टीव्ही चॅनेलमध्ये कार्यरत असणाऱ्या फिल्ड वर्क संपादकांसाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या एका बैठकीचे आयोजन आज दुपारी ४ वाजता करण्यात आले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अच्युत मोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत पत्रकारांसाठी घरकुल योजना, विमा सुरक्षा, आरोग्य तपासणी, मुलांसाठी शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक सवलती यांसारख्या अनेक महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, दिलीप पोहनेरकर, सुशील वाठोरे, संदीप भाकरे, कादरी हुसेन, अतुल पडूळ, संतोष भुतेकर, राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष विनोद काळे, दशरथ वाकोडे, दिनेश नंद यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत पत्रकार घरकुल योजना, पत्रकार विमा सुरक्षा, पत्रकार व कुटुंबीयांची आरोग्य तपासणी, पत्रकारांच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती व शैक्षणिक सवलत योजना राबवणे, त्यासाठी पत्रकारांची निवड करणे आणि योजनेसाठी पत्रकारांची पात्रता यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करण्यात आले.

अच्युत मोरे यांनी यावेळी सांगितले की, या योजनांचा लाभ केवळ पत्रकारांनाच नव्हे, तर पत्रकारितेच्या कामात महत्त्वाची भूमिका बजावणारे ऑपरेटर्स आणि वृत्तपत्र वितरक यांनाही देण्यात येणार आहे. लवकरच एक फॉर्म उपलब्ध केला जाईल आणि तो भरून सादर करण्याचे आवाहन मोरे यांनी केले.

पत्रकार आणि वृत्तपत्रात काम करणाऱ्या प्रत्येक घटकाच्या आरोग्याच्या दृष्टीने दरवर्षी किमान दोनदा आरोग्य शिबीर आयोजित करण्याचा मानसही अच्युत मोरे यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यातील विविध रुग्णालयांमध्ये पत्रकारांना सवलत मिळावी यासाठी रुग्णालयाच्या प्रशासनाशी चर्चा करून सवलती मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सर्वानुमते ठरले. तसेच, विविध औषधी दुकानांवरही सवलत मिळवण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे निश्चित करण्यात आले.

प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी माहिती दिली की, त्यांच्या प्रयत्नाने यापूर्वीच विवेकानंद हॉस्पिटल आणि इंजे मेडिकल येथे पत्रकारांना सवलतीच्या दरात उपचार व औषधे मिळत आहेत. भविष्यात उपस्थित सर्वांच्या सहकार्याने इतर हॉस्पिटल्सना भेटी देऊन पत्रकारांना सवलती मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही दीपक शेळके यांनी सांगितले.

युवा आदर्श

**शकट ...**

पराजीत होई जसे
दिग्गज नेते बडेबडे
दया आहे रे गडबड
प्रवक्ते त्वरे बड बडे
झाली जरी एकहार
वाटे सगळे जग बुडे
आग लागता बुडाशी
येतात कसे बुड बुडे
सिस्टिम मध्येचं दोष
हरलेले कसे हडबडे
आरोपामागे आरोप
प्रत्येक जण लडबडे
जनता बिचारी त्रस्त
कुणाला सांगू दुखडे
कुणी विचीत्र प्रश्नांने
बळी राजावर उखडे
हलवाया सत्तास्थान
का हरप्रकारे धडपडे
कसे सांगावे उंचउडे
ओले पंख फडफडे
सल्ला खरा सबुरीचा
कोण देणार बरे धडे
कसा चालवी शकट
जनमनामधे धडधडे

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# आरोग्य सेवेत परिवर्तनासाठी कटिबद्ध - खासदार डॉ. काळे

## जालना लोकसभा मतदारसंघात २० नवीन आरोग्य सुविधा मंजूर, ११.६६ कोटींचा निधी उपलब्ध

**जालना । प्रतिनिधी -** जालना लोकसभा मतदारसंघाच्या आरोग्य सुविधांमध्ये ऐतिहासिक भर घालणारा एक महत्त्वाचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे केंद्र शासनाच्या १५व्या वित्त आयोगांतर्गत मतदारसंघासाठी एकूण २० नवीन आरोग्य सुविधा केंद्रे मंजूर झाली आहेत. यासाठी सुमारे ११६६.३८ लाख रुपये (सुमारे रु ११.६६ कोटी) निधीची तरतूद करण्यात आली आहे.

या मंजूर झालेल्या आरोग्य सुविधांमध्ये १८ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे आणि २ तालुका सार्वजनिक आरोग्य कक्षांचा समावेश आहे. या निर्णयामुळे जालना लोकसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आणि सुलभ आरोग्यसेवा मिळण्याचा मार्ग मोळका झाला आहे.

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी खासदार झाल्यापासून आपल्या मतदारसंघातील आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी सरकार दरबारी सातत्याने आवाज उठवला होता. केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांसाठी प्रस्ताव मागवले असता, डॉ. काळे यांनी स्वतः पुढाकार घेऊन गरजू भागांची माहिती संकलित केली. त्यांनी हे प्रस्ताव पाठवून मंजुरीसाठी अथक पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांना यश येऊन आज केंद्र शासनाकडून या प्रस्तावांना मान्यता मिळाल्याचे घोषित करण्यात आले.



मंजूर झालेली कामे आणि निधीवाटप (प्रमुख ठिकाणांमध्ये): तालुका सार्वजनिक आरोग्य कक्ष: सिल्लोड व फुलंब्री (प्रत्येकी रु ५० लाख), पैठण तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे: रांजणगाव, बोकुड जळगांव, केकत जळगांव, पारुंडी तांडा, खादगाव, सोमपुरी (प्रत्येकी रु ६१.१९ लाख), अंबड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे: कर्जत व हस्तपोखरी (प्रत्येकी रु. ५८.२७ लाख), बदनापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे: चिखली, धोपटेश्वर व नांदखेडा (प्रत्येकी रु ५८.२७ लाख), भोकरदन तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे: सिपोरा बाजार, तांदुळवाडी, सुरंगळी व बरंजळा लोखंडे (प्रत्येकी रु ५८.२७ लाख), जाफ्राबाद तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे: आंबेगांव, अकोला देव, आसई (प्रत्येकी रु ५८.२७ लाख), या सर्व कामांसाठी मिळून एकूण रु ११६६.३८ लाख निधी मंजूर करण्यात आला आहे.

या मान्यतेमुळे केवळ नवीन इमारती उभ्या राहणार नाहीत, तर ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेवर वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणार आहेत. या आरोग्य केंद्रांमुळे गावपातळीवरील आरोग्य व्यवस्थेचा पाया मजबूत होईल. तसेच, माता-मुलांचे आरोग्य, बालसंगोपन, पान २ वर




# पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर आवास लाभार्थ्यांच्या खात्यात तातडीने पहिला हप्ता जमा करा

## आमदार बबनराव लोणीकर यांच्या पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना सूचना

**जालना । प्रतिनिधी -** माजी मंत्री आणि आमदार बबनराव लोणीकर यांच्या अथक प्रयत्नांमुळे जालना जिल्ह्यातील धनगर समाजातील गरजू कुटुंबांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेअंतर्गत ६,९४३ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे, ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण उपलब्धी आहे. या योजनेसाठी ८६ कोटी ६४ लाख रुपये इतका भरीव निधी प्राप्त झाला आहे, ज्यामुळे अनेक कुटुंबांना स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या योजनेच्या माध्यमातून गरजू कुटुंबांना पक्की घरे मिळणार असून, त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडण्याची अपेक्षा आहे. विशेषतः मंठा आणि परतूर तालुक्यातील सर्व लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पहिला हप्ता म्हणून १५,००० रुपये यशस्वीरित्या जमा झाले आहेत. यामुळे या भागातील लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे, कारण त्यांना आता घरबांधणीच्या प्रक्रियेला सुरुवात करता येणार आहे.

मात्र, जालना पंचायत समिती अंतर्गत असलेल्या अत्यंत ढिसाळ नियोजनामुळे इतर लाभार्थ्यांना पहिला हप्ता मिळण्यास उशीर होत आहे. ही बाब अनेक गरजू कुटुंबांसाठी निराशाजनक ठरत आहे, कारण त्यांना आपल्या घराच्या बांधकामाला सुरुवात करण्यासाठी या निधीची प्रतीक्षा आहे. या समस्येची तात्काळ दखल घेत, श्री. बबनराव लोणीकर यांनी जालना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. संदीप पवार यांच्याशी थेट फोनवर संपर्क साधला आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजनेच्या सर्व लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पहिला हप्ता तातडीने जमा करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. लोणीकर यांच्या या त्वरित हस्तक्षेपामुळे प्रशासकीय यंत्रणेला गती मिळण्याची अपेक्षा आहे, आणि लवकरच इतर लाभार्थ्यांनाही निधी प्राप्त होईल, अशी आशा आहे.



श्री. बबनराव लोणीकर यांचे या योजनेतील सक्रिय नेतृत्व आणि जनतेच्या हितासाठी सातत्याने केलेला पाठपुरावा यामुळे धनगर समाजातील गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. त्यांनी केवळ निधी मंजूर करून घेण्यातच यश मिळवले नाही, तर त्याच्या अंमलबजावणीवरही लक्ष ठेवून प्रशासकीय अधिकाऱ्यांना जबाबदार धरले आहे. त्यांच्या या कार्यामुळे समाजातील वंचित घटकांना न्याय मिळत आहे, आणि त्यांचे जीवनमान सुधारण्याच्या पान २ वर

## संपादकीय

# ओटीटी प्लॅटफॉर्मसाठीही सेन्सॉरबोर्ड हवे

कोरोना काळात लॉकडाउन असल्याने चित्रपटगृहे बंद होती अशावेळी नवीन चित्रपटांच्या प्रसारणासाठी निर्माते, दिग्दर्शकांनी ओटीटी प्लॅटफॉर्मला पसंती दिली. प्रेक्षकांनाही हा नवा पर्याय खूप आवडला कारण चित्रपटगृहात न जाता घरात बसून आपल्या लॅपटॉपवर, कॉम्प्युटरवर किंवा अगदी हातातल्या मोबाईलवर देखील नवा चित्रपट पाहायला मिळू लागला त्यामुळे प्रेक्षक ओटीटी प्लॅटफॉर्मला पसंती देऊ लागले. ओटीटी प्लॅटफॉर्मची लोकप्रियता जशी वाढत गेली तसे निर्माते दिग्दर्शक या प्लॅटफॉर्मवर चित्रपट प्रदर्शित करू लागले. त्यातही सलग तीन तास छोट्या स्क्रीनसमोर प्रेक्षकांना बसणे शक्य होत नाही हे लक्षात आल्यावर निर्मात्या दिग्दर्शकांनी त्यालाही पर्याय शोधून काढला तीन तासांचे चित्रपट सहा ते दहा भागात वेबसिरीजच्या रूपात प्रदर्शित करू होऊ लागले. ओटोटीच्या या वेबसिरीजला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. हिंदी वेबसिरीजने तर कमालीची लोकप्रियता मिळवली. या वेबरीजममध्ये चित्रपटसृष्टीतील सर्वच दिग्गज कलाकार भाग घेऊ लागले. चित्रपटगृहात चित्रपट प्रदर्शित करण्यासाठी सेन्सॉरबोर्डची मान्यता आवश्यकता असते. तशी वेबसिरिजना नसते त्यातही या वेबसिरीजचे सर्वाधिक प्रेक्षक हे २० ते ४० या वयोगटातील म्हणजे तरुण असतात. सेन्सॉरबोर्ड नाही आणि प्रेक्षक तरुण मग काय निर्माते दिग्दर्शकांनी वेबसिरीजद्वारे ओटीटी प्सवर अश्लीलतेचा भडिमार सुरू केला. अश्लीलतेचा भडिमार असलेल्या अशा शेकडो प्स ओटोटी प्लॅटफॉर्मवर धुमाकूळ घालू लागल्या. अलीकडील काळात तर अश्लील ओटोटी प्सचा इंटरनेटवर महापूर आला. या ओटोटी प्सवर अश्लीलतेचा अक्षरशः नंगानाच चालू झाला. फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडिया साईटवर या ओटीटी प्स आणि वेबसिरीजची अश्लील दृश्ये मुद्दामहून प्रसारित केली जाऊ लागली जेणेकरून तरुण मुले ही प्स आणि वेबसिरीज पाहतील. तरुण मुलांना अश्लीलतेकडे घेऊन जाणाऱ्या या अश्लील प्सवर आणि वेबसिरीजवर बंदी आणावी अशी मागणी होऊ लागली. गल्लीपासून दिल्लीपर्यंत सर्वत्र ही मागणी होऊ लागली. संसदेत देखील काही खासदारांनी अश्लील प्सवर बंदी घालावी अशी मागणी केली. काही सुजाण नागरिकांनी त्यासाठी न्यायालयाची दारे देखील ठोठावली. सुजाण नागरिकांच्या या मागणीला अखेर यश मिळाले. मागील आठवड्यात केंद्र सरकारने देशातील २५ ओटीटी प्स वर बंदी घातल्याची घोषणा केली. बंदी घालण्यात आलेल्या ओटीटी प्समध्ये उल्लू, एएलटीटी आणि डिसिफ्लिक सारख्या काही मोठी नावे समाविष्ट आहेत. माहिती प्रसारण मंत्रालयाने यासंदर्भात एक अधिसूचनाही जारी केली आहे. त्यात म्हटले आहे की या निर्णयाचा मुख्य उद्देश अश्लील सामग्रीचा प्रसार रोखणे हा आहे. अशी सामग्री भारतीय कायदेशीर आणि सांस्कृतिक मानकांचे उल्लंघन करणारी मानली जातात. बंदी घालण्यात आलेल्या अन्य प्समध्ये बिगशॉट, बूमएक्स, नवरासा लाईट, गुलाब प, बुल प, जलवा प, कंगन प, वॉव एंटरटेनमेंट, लुक एंटरटेनमेंट, हिट प्राईम, फेनियो, शोएक्स, सोल टॉकिज, अड्डा टीव्ही, हॉट एक्स, व्हीआयपी, हलचल प, मूड एक्स, निऑन एक्स, फुगी, मोजफ्लिक्स, ट्रायफ्लिक्स यांचा समावेश आहे. सरकारने इंटरनेट सेवा प्रदात्यांना भारतात या वेबसाइटवर सार्वजनिक प्रवेश थांबवण्याचे निर्देश दिले आहेत. सरकारने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह आहे. या अश्लील प्सवर बंदी घालण्याच्या सरकारच्या निर्णयाचे सर्वत्र स्वागतच होत आहे. केवळ या २५ प्सवरच नाही तर यासारख्या ज्या ज्या प्सवर अश्लीलतेचा नंगानाच चालू आहे अशा सर्वच प्सवर सरकारने बंदी घालायला हवी. याशिवाय ओटीटी प्लॅटफॉर्मवर सुरू असणाऱ्या सर्वच अश्लील वेबसिरिजवर देखील बंदी घालायला हवी. ओटीटी प्लॅटफॉर्मवर चालू असलेल्या अश्लील वेबसिरिज समाजाचा समतोल बिघडवत आहेत. या वेबसिरीज मोबाईलवर पहायला मिळत असल्याने अल्पवयीन मुलेही या वेबसिरीज चवीने पाहत असतात. वेबसिरिजसाठी सेन्सॉरबोर्ड नसल्याने यात काहीही दाखवले जाते. आक्षेपार्ह, अश्लील, लोकांच्या भावना दुखावणारे, भावना चाळवणारे, हिंसेला, व्यसनाला प्रोत्साहन देणारे असे सर्व ज्यांच्यावर सर्वसाधारण स्थितीत बंदी घातली जाऊ शकते किंवा प्रौढांसाठी म्हणून बिरूद लावले जाऊ शकते असे सर्वकाही दाखवले जाते. सेन्सॉरबोर्ड नसल्याने निर्माते दिग्दर्शक आक्षेपार्ह दृश्ये दाखवतात. वेबसिरिजना चित्रपटासारखे स्वतंत्र सेन्सॉरबोर्ड लागू केले तर या गोष्टींना आळा बसेल चित्रपट असो की वेबसिरीज सेन्सॉरबोर्डने मान्यता दिल्याशिवाय ओटोटी प्लॅटफॉर्मवर दाखवण्यात येऊ नये.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# सरकार नाही मायबाप

सरकारला मायबाप म्हणण्याची पद्धत कधी सुरू झाली. माहीत नाही. पण आजही लोक असे म्हणताना दिसतात. एक काळ असा होता की, जेंव्हा 'राजाची मर्जी' हाच कायदा असायचा. त्याची 'खप्पा मर्जी' होऊ नये, त्याने माफी द्यावी म्हणून लोक राजाकडे गयावाया करताना, राजाला माय बाप म्हणू लागले असावेत असा अंदाज बांधता येतो. मोठा दुष्काळ पडला, अतिवृष्टी झाली तेंव्हा जगायचे कसे असा प्रश्न पडायचा तेंव्हा याचना करताना लोक राजाला मायबाप म्हणून विनवत असतील. शेतकरी खूप कष्टाने अन्नधान्य पिकवायचे. खळे झाले की शस्त्राने सज्ज असलेले लुटारू यायचे व तयार केलेले सर्व धान्य लुटून न्यायचे. प्रतिकार केला तर बेदम मारहाण करायचे. स्त्रियांची अब्रू लुटायचे. अशा लुटारुंकडून कोण वाचवणार? शस्त्रास्त्र बाळगणारा राजाच! तोही साऱ्याच्या रूपाने लूट करायचाच. पण तो बोलून चालून उघड उघड केलेला करार असायचा. शेतकरी राजाकडे धाव घ्यायचे व म्हणायचे, आम्हाला वाचवा. तुम्हीच आमचे मायबाप आहात, आम्हाला लुटारू पासून वाचवा. राजाची प्रतिमा रुजवण्यासाठी तेथे भाट असायचे. राजा म्हणजे देवाचा अवतार म्हणायचे. लोकांना वाटायचे की देवाच्या अवताराला मायबाप म्हणायला काय हरकत आहे.

राजे गेले, राजेशाही गेली, रीतसर लोकशाही आली. राजाच्या मर्जीचा कायदा होणे बंद झाले. संविधान आले, कायदे आले तरी लोकांची मानसिकता बदलली नाही. काल जसे ते राजाला मायबाप म्हणायचे, तसेच ते आज, आमदाराला, खासदाराला, मंत्री, मुख्यमंत्र्याला, राज्यपाल, पंतप्रधानाला मायबाप सरकार म्हणू लागले..एवढेच काय, तलाठी, ग्रामसेवकापासून पोलीस आणि जिल्हाधिकारी येथून तेथून सगळ्या नोकरांना मायबाप सरकार म्हणू लागले.

**राज्य कसे जन्मले?**

हे जग अस्तित्वात आले तेंव्हा राज्य नावाची संस्था अस्तित्वात नव्हती. ती खूप अलिकडच्या काळात जन्माला आली आहे. एक काळ असा होता, जेंव्हा पृथ्वीवची सर्व माणसे अन्नासाठी वणवण भटकत होती. कंद-मुळे, फळे एवढेच काय पाने खाऊन देखील दिवस काढायची. समुद्र किनाऱ्यावरचे लोक मासे खायचे. काही धाडसी लोक शिकार करायचे. प्राण्यांचे मास खायचे. असे म्हणतात की, हे सगळे सुरू असताना एक गर्भवती बाई फारशी धावपळ करू शकत नव्हती म्हणून एके ठिकाणी बसून राहिली. तिला खायला तर लागणारच होते. जेथे आपलेच भागवण्याची मारामार, तेथे तिला कोण आणून देणार? ती बसली होती तेथे असलेल्या झुडपांना जे लागले होते, ते ती ओरबाडून घ्यायची. खायची. काही दाणे तिने थुकले, त्यावर माती पडली. पाऊस झाला आणि दोनचार दिवसांनी अंकुर फुटले. तिला तो चमत्कार वाटला. त्या बाईच्या लक्षात आले की, जे दाणे आपण खाऊ शकतो, ते उगवूही शकतो. हाच शेतीचा शोध होता.

सुरुवातीला थोडे पिकले, नंतर गरजे एवढे पिकले, तोपर्यंत कोणी फारशी दखल घेतली नाही. पण जेव्हा गरज भागून उरले व पुढच्या वर्षीच्या बेगमीची तजवीज झाली, तेंव्हा पहिल्या पिढीच्या त्या शेतकऱ्यांना कोण आनंद झाला. पण हा आनंद फार काळ टिकला नाही. तेथे असलेल्या काही ऐतखाऊ लोकांनी हे पाहिले. त्यांनी लाठ्या काठ्या घेऊन रात्री हल्ला केला. शेतकऱ्यांना बेदम मारले व त्याच्या जवळचे सगळे धान्य घेऊन पसार झाले. शेतकरी काय करणार? तो पुन्हा कामाला लागला. पुन्हा धान्य पिकले. तिकडे लुटारू बिनघोर अन्न खात होते. त्यांनी विचार केला, आता लाठ्या काठ्यानी भागणार नाही. त्यांनी भाले तयार केले. ते भाल्याच्या बळावर शेजाऱ्यांना लुटू लागले. पुढे त्यांनीच तलवारी आणि बंदुकी बनवल्या. शेतकऱ्यांकडे बचत राहिली तेंव्हा त्यांनी अवजार बनवले, तीच बचत जेंव्हा लुटारूंकडे गेली तेव्हा त्यांनी हत्यार बनवले.

शेतकऱ्यांना लुटायचा धंदा सोपा होता, त्यात अनेक जण आले. त्यांच्या टोळ्या झाल्या. शेतकरी कष्ट करून पिकवायचे आणि या टोळ्या येऊन सगळा माल लुटून न्यायच्या. ही टोळी यायची शेतकऱ्यांना मारायची. ती यायची मारायची. शेतकरी जेरीस आले. एका टोळीवाल्याला त्यांनी सांगितले की, 'बाबा ही मारहाण थांबवा. तुम्हाला काय पाहिजे ते सांगा. आम्ही मुकाट्याने देतो. ही सततची मारहाण थांबवा.' टोळीवाल्याला हीच संधी हवी होती. म्हणाला. 'येथून पुढे तुम्हाला लुटण्याचा अधिकार माझा. दुसरा कोणी आला तर मी बंदोबस्त करीन. तुम्ही मला गपगुमान सहावा हिस्सा आणून द्यायचा.' अनेकांचा मार खाण्यापेक्षा एकाचा खाऊ. असा विचार करून शेतकरी कामाला लागले. तो लुटारू टोळीवाला त्या दिवशी राजा झाला. जेवढ्या भागातले शेतकरी त्याला गुमान सहावा हिस्सा देऊ लागले, तेवढा भाग त्याचे राज्य झाले. राजा आणि राज्य जन्माला आले ते शेतकऱ्यांना लुटण्यासाठी, लुटारुंनी जेंव्हा शेतकऱ्यांना गुलाम केले तो हा दिवस आहे. राजा मायबाप नाही हे लक्षात घ्या.

**सरकार आणि शेतकरी**

छत्रपती शिवाजी महाराजांसारखा दुसरा राजा झाला नाही. शेतकरी आणि स्त्रियांच्या बद्दल त्यांची कामगिरी लोकशाही राज्यात देखील पाहायला मिळत नाही. महाराजांनी प्रजेची लूट केली नाही तर पालकाने करावी तशी काळजी घेतली! इतिहासाच्या काळ्याकुट्ट पानांच्या पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांचे सोनेरी पान तेवढे अपवाद आहे. एरवी सगळ्या राजांनी, सगळ्या संस्थानिकांनी, सगळ्या वतनदारांनी शेतकऱ्यांची लुटच केली. शेतकऱ्यांची लूट करून महाल बांधले, त्यात चैन आणि विलास केला.

इंग्रज भारतात आले आणि त्यांनी लुटीची पद्धत बदलून टाकली. आतापर्यंत शेतकरी शेतसारा वस्तू रुपात म्हणजे शेतमाल देऊन भरायचे. इंग्रज म्हणाले शेतसारा रकमेत भरावा लागेल. रक्कम मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना बाजारात जाणे भाग पडले. त्यापूर्वी व्यापारी दारावर यायचे. आता शेतकऱ्यांना त्यांच्या दारावर जाणे भाग पडले. इंग्रजानी पहिल्यांदा भारतात कायदा आणला. इतर बाबतीत लागूही झाला पण शेतकऱ्यांचे हाल संपले नाही.

स्वदेशी राजे असो, संस्थानिक असो, परकीय मोगल असो की इंग्रज असो, सगळ्या सरकारांनी शेतकऱ्यांना लुटले. त्यांनी एकही संधी सोडली नाही, त्याही पेक्षा त्यांनी शेतकऱ्यांना अक्षरश हतबल करून लुटले. याचे असंख्य पुरावे आज उपलब्ध आहेत. असे असतानाही जर कोणी म्हणाला की, सरकार मायबाप असते तर त्याला आपण शहाणा कसे म्हणणार?


**आपली सरकारे सुद्धा मारेकरीच**

१९४७ साली १५ ऑगस्ट रोजी आपला देश स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० रोजी आपण संविधान स्वीकारले. संविधान स्वीकारल्यानंतर पहिल्या दीडच वर्षात पहिली घटना दुरुस्ती (?) करण्यात आली. अनुच्छेद ३१ ए व बी मध्ये तरतूद करून संविधानात नसलेले परिशिष्ट-९ जोडण्यात आले. या परिशिष्टात जे कायदे टाकले जातील त्यांच्या विरोधात न्यायालयात दाद मागता येणार नाही. सर्वोच्च न्यायालय देखील त्या कायद्याना हात लावू शकत नाही, अशी घटना दुरुस्ती (?) करण्यात आली. ही घटनादुरुस्ती (की बिघाड) मूळ घटनेच्या तत्वांशी विसंगत होती. आज परिशिष्ट ९ मध्ये २८४ कायदे आहेत त्या पैकी सुमारे २५० कायदे शेती आणि शेतकऱ्यांशी थेट संबंधित आहेत. हवं योगा योग्य असू शकत नाही. देशाच्या स्वातंत्र्याच्या सुर्योदया सोबत शेतकऱ्यांच्या घरात अंधार पसरवला गेला. पुढंचयानी तो अधिक गडद केला.

१९४८ ला जमीनदारी निर्मूलनाचा कायदा आला. त्याच्या पाठोपाठ 'कसेल त्याची जमीन' अशी घोषणा देऊन कूळ कायदा आला. 'काम करेल त्याचा कारखाना' अशी घोषणा देऊन कारखाने कामगारांच्या ताब्यात दिले नाहीत. कूळ कायद्याचे हिरीरीने समर्थन करणाऱ्या डाव्या नेत्यांपैकी एकानेही आवाज उठवला नाही. कूळ कायदा लागू झाला. भूमिहीनांना जमिनी मिळाल्या. त्या पाठोपाठ 'कमाल शेतजमीन धारणा कायदा' आला. लोक त्याला 'सीलिंग'चा कायदा म्हणतात. या कायद्याने शेतकऱ्यांवर शेतजमीन धारणेचे बंधन घातले. लक्षात घ्या, हा कायदा फक्त 'शेत'जमीन बाबत आहे. हे बंधन फक्त शेतकऱ्यांवर टाकलेले आहे. कारखानदारांवर नाही. अजिबात नाही. कारखानदार कितीही जमिनीचा मालक बनू शकतो. आज हजारो एकरचे एकेक मालक आहेत. त्यांना आमचे डावे मित्र 'जमीनदार' म्हणत नाहीत. सीलिंग कायद्याचा भीषण फटका शेतीक्षेत्रावर बसला. सजीव प्राण्याच्या शरीरातील प्रत्येक मास पेशी (सेल) विघटित होत असेल तर माणसाची जी स्थिती होते तशी शेती व्यवस्थेची आज झाली आहे.

१९५५ ला आवश्यक वस्तूंचा कायदा आला. या कायद्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला वाजवी किंमत मिळू नये, अशी व्यवस्था केली.

एकानंतर एक असे हजारो कायदे करून शेतकऱ्यांना जेरबंद करण्यात आले. याच कायद्यांच्या बंधनांमुळे शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळी आली. अशा सरकारला मायबाप सरकार म्हणणे संयुक्तिक ठरणार आहे का? सरकार मायबाप नव्हे शेतकऱ्यांचे मारेकरी आहे.



सुरुवातीच्या काळात लुटारू येऊन शेतकऱ्यांना मारहाण करायचे. नंतर रक्तपात व्हायला लागला. रक्तपात करून किती शेतकरी मारले? शेकडो आणि हजारो! भारताचे सरकार हुशार निघाले, त्यांनी रक्तपात केला नाही, फक्त असे कायदे केले की तुम्ही स्वतः जाऊन मराल. असे हजारो नव्हे, लाखो शेतकरी मारले. या नरसंहारात या देशातील सर्वच राजकीय पक्षांचे हात शेतकऱ्यांच्या रक्ताने माखलेले आहेत. काँग्रेस असो की भाजप दोघेही शेतकऱ्यांचे मारेकरी आहेत. मायबाप नव्हेत!

**योजना नको कायदे हटवा**

सरकार शेतकऱ्यांसाठी काय करते?
- योजना बनवते.
आता पर्यंत किती योजना बनवल्या?
- देशभरात हजारो योजना आहेत.
शेतकऱ्यांच्या परिस्थितीत काही बदल झाला का?
-अजिबात नाही. उलट जास्त बिकट परिस्थिती झालेली दिसते.
काही कुटुंबे सुधारलेली दिसतात?
- त्याचे कारण ह्या योजना नव्हेत. त्यांच्या कुटुंबातील कोणी तरी जॉबला लागलेला असतो. शेतीबाह्य कारणांनी काही कुटुंबांची परिस्थिती सुधारलेली दिसते.
सरकारी योजनांवरील पैसा जातो कोठे?
- सरकारी नोकर, सत्ताधारी पुढारी, आणि बागलबच्चे हडप करतात. म्हणून ते पोसले जातात.

सरकारी योजना ह्या फसव्या आहेत. मी नुकताच एक अंदाज काढला की शेतकरी जी एस टी आणि इतर करांच्या रूपाने सरकारला किती पैसे देतात! हा आकडा धक्का दायक आहे. केवळ जी एस टी चा आकडा पहा. महाराष्ट्रातील कापूस, सोयाबीन आणि ऊस फक्त या तीन पिकांचे शेतकरी सरासरी १२ टक्के जी एस टीच्या हिशोबाने जवळपास वीस हजार कोटी रुपये नुसती जी एस टी सरकारला देतात. पेट्रोल डिझेलचा हिशोब वेगळा. याला माढ्याच्या टाळू वरचे खाणे म्हणतात.

शेतकऱ्यांचे खरोखरच भले करायचे असेल तर पिंजऱ्यातील दाणे बदलून किंवा वाढवून चालणार नाही, पिंजऱ्याचे दार उघडावे लागेल. पिंजऱ्याचे दार उघडायचे म्हणजे जे कायदे निर्बंध लावणारे आहेत, ते रद्द करायचे. माझ्या मते, कमाल शेतजमीन धारणा, आवश्यक वस्तू, जमीन अधिग्रहण या कायद्यांनी शेतकऱ्यांना गुलाम बनवले आहे. ते रद्द केले पाहिजेत. जे सरकार हे कायदे रद्द करत नाही ते कसले आले मायबाप? हे तर राक्षसांचे कळप आहेत.

सरकार नाही मायबाप ।
जे देती सर्जकांना ताप.
सरकार काळ राक्षसांचे कळप ।
नारी शेतकऱ्यांवर मारती झडप.
झुगारणे सरकारी निर्बंध ।
हाच एक मुक्तीचा सुगंध.

**-- अमर हबीब, आंबाजोगाई**
**मो. ८४११९०९९०९**

# छत्रपती शिवरायांविषयी विकृत माहिती देणाऱ्या 'खालिद का शिवाजी' चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी

**मुंबई** - 'खालिद का शिवाजी' या आगामी मराठी चित्रपटामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांविषयी ऐतिहासिकदृष्ट्या खोटी, तथ्यहीन व विकृत माहिती देऊन समस्त जनतेची दिशाभूल केली आहे. या विकृत प्रचारामुळे समस्त शिवप्रेमींच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. ज्याप्रमाणे ''उदयपूर फाइल्स : कन्हैय्यालाल टेलर मर्डर'' या चित्रपटामुळे मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्यामुळे त्यावर अंतरिम बंदी आणण्यात आली, त्याचप्रमाणे ''खालिद का शिवाजी'' या चित्रपटावर देखील बंदी घालण्यात यावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने राज्य व केंद्र सरकारकडे केली आहे.

या चित्रपटात शिवाजी महाराजांच्या सैन्यात ३५% मुस्लिम सैनिक होते, महाराजांचे ११ अंगरक्षक मुस्लिम होते, आणि रायगडावर महाराजांनी मशिद बांधली होती, असे आक्षेपार्ह व विकृत दावे करण्यात आले आहेत. हे सर्व दावे भ्रामक, अप्रामाणिक व कोणत्याही ऐतिहासिक पुराव्याविना प्रसारित करण्यात आले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक होते. त्यांनी धर्मनिष्ठ हिंदवी स्वराज्य उभारले. त्यांनी स्वतः आपल्या सावत्र भाऊ व्यंकोजी राजेंना लिहिलेल्या पत्रात स्पष्ट उल्लेख केला आहे की, तुर्क फौजेत ठेविले, मग जय कैसा होईल? त्यामुळे या चित्रपटात शिवाजी महाराजांना 'सेक्युलर' ठरवण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न इतिहासाच्या नावाने समाजात गोंधळ निर्माण करणारा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात कोणतीही जातीय जनगणना नव्हती. अशा परिस्थितीत ३५% मुस्लिम सैनिक असल्याचा दावा कोणत्या आधारावर केला जात आहे? असा सवाल समितीने उपस्थित केला आहे.

जर मुस्लिम समाजाला खरेच छत्रपती शिवाजी महाराजांविषयी प्रेम असते, तर पाच मुसलमान पातशाह्यांनी त्यांना संपवण्याचा चंग बांधला नसता किंवा छत्रपती संभाजी महाराजांना हालहाल करून मारले नसते. सध्याच्या काळातही जर मुसलमान समाजाला शिवाजी महाराजांप्रती आदर असता, तर यवत (ता. दौंड, जि. पुणे) येथे झालेल्या हिंसाचारात 'सय्यद' नावाच्या धर्मांध व्यक्तीने छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती फोडली नसती. त्यामुळे ''खालिद का शिवाजी'' हा चित्रपट हिंदू समाजात भ्रम निर्माण करणारा आणि शिवाजी महाराजांचे खोटे चित्रण करणारा आहे.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९(२) आणि भारतीय दंड संहिता कलम २९५ (अ) नुसार, छत्रपती शिवाजी महाराजांचे विकृत चित्रण जनतेच्या धार्मिक भावना दुखावणारे, तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारे ठरू शकते. पूर्वीही 'पद्मावत', 'जोधा अकबर' या चित्रपटांच्या वेळेस अशाच प्रकारच्या विकृत इतिहासामुळे जनक्षोभ निर्माण झाल्याची उदाहरणे आहेत. या पार्श्वभूमीवर 'खालिद का शिवाजी' या चित्रपटावर जोपर्यंत त्यातील ऐतिहासिक माहितीचे अधिकृत सत्यापन होत नाही तोपर्यंत बंदी घालण्यात यावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे.

## पान १ व ४ वरुन

### राज्यमंत्री बोर्डीकरांच्या ...

काळ्या फिती लावून कामकाज करत निषेध नोंदवण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणारा हा मुकमोर्चा गुरुवार, दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत जिल्हा परिषद कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय जालना या दरम्यान असेल. या शांततापूर्ण मुकमोर्चात ५०० ते ५५० ग्रामपंचायत अधिकारी सहभागी होणार असल्याची माहिती निवेदनात नमूद करण्यात आली आहे. कोणतीही घोषणाबाजी न करता, हातात फलक घेऊन, शांततेत व शिस्तीत हा मोर्चा काढण्यात येणार असल्याची हमी ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिली आहे.

ग्रामपंचायत युनियनच्या राज्य उपाध्यक्ष श्रीमती दुर्गा भालके, मानद अध्यक्ष पी. बी. पवार, अध्यक्ष डी.बी काळे, सरचिटणीस व्ही.ए.भगत, कार्याध्यक्ष एम. एम. मिसाळ, कोषाध्यक्ष एस. व्ही. पुरी, उपाध्यक्ष पी.पी. पालवे, एस.व्ही. काचेवाड, श्रीमती सुरेखा लाखोले आदी जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी, जालना तालुकाध्यक्ष आर.यु.गोरे, सचिव महेश वझरकर, बाबासाहेब चव्हाण, नरेंद्र पवार, विठ्ठल तेलकर, समाधान सोनवणे, सिद्धार्थ पगारे, लक्ष्मण आहेरकर, नीता खरात, सुनील पाटील, मदन डोईफोडे, महादेव रुपनर, दत्ता मानकर, सचिन एखुंडे, युवराज वैराळ यांच्यासह जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्ष, सचिवांनी सर्व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी या मुकमोर्चात शंभर टक्के सहभागी होऊन मोर्चा यशस्वी करावा, असे आवाहन केले आहे.

### युवकास मारहाण ...

खाली पडला त्यानंतरही सर्वांनी त्याला मारणे सुरु ठेवले. आम्ही आरडा ओरड केल्यानंतर लोकं जमा झाले. शिवम भुरेवाल जखमी अवस्थेत खाली पडल्याने आम्ही त्यास मोटारसायकलवर बसवत असतांना वरील सर्वांनी मला व प्रतिक यास चापटबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर आम्ही तेथून मोटारसायकलवरून कसे बसे निघून शिवम यास जखमी अवस्थेत विवेकानंद हॉस्पीटल जालना येथे दाखल ककेले. तेथील डॉक्टरांनी शिवम याचेवर उपचार करुन त्यास जास्त मार लागल्याने पुढील उपचाराकरीता रेफर केले. त्यानंतर शिवम यास छत्रपती संभाजीनगर येथील कमल नयन बजाज हॉस्पीटल येथे ॲडमीट केले सध्या शिवम आयसीयु मध्ये उपचार घेत असून तो बोलण्याच्या स्थितीत नसल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. अशा फिर्यादीनुसार, लोकश भगत, वंश भगत, हर्षल भगत, सुमीत आढे, सोन्या जाधव, दिपसिंग कलानी या व्यक्तींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएसएस), २०२३ च्या १०९(१), ११८(१), ११८(२), ११५(२), ३५२, १८९(२), १९०, १९१(२), १९१(३) इत्यादी) कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहे.

### आरोग्य सेवेत ...

लसीकरण (टिकाकरण) आणि प्रसूती सेवा अधिक प्रभावी बनण्यास मदत होईल.

ही कामगिरी केवळ एक विकास यशकथा नसून, ती खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या लोकहिताशी बांधिलकी, दूरदृष्टी आणि कार्यक्षम नेतृत्वाचे प्रतीक असल्याचे मानले जात आहे. यामुळेच सर्वसामान्य जनतेपासून ते प्रशासनाच्या वरिष्ठ पातळीपर्यंत सर्वत्र डॉ. काळे यांच्या कार्याची प्रशंसा होत आहे.

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, मी जालना लोकसभा मतदारसंघाच्या प्रत्येक गावात दर्जेदार आरोग्य सुविधा पोहोचवण्यासाठी वचनबद्ध आहे. केंद्र शासनाच्या सहकार्याने हे स्वप्न हळूहळू साकार होत आहे. आरोग्य सेवेतील हे परिवर्तन म्हणजे मतदारसंघाच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी असल्याचे ते म्हणाले.

### पुण्यश्लोक आहिल्यादेवी ...

दिशेने एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे. या प्रयत्नांबद्दल लोणीकर यांचे मनापासून आभार मानले जात आहेत. जालना पंचायत समितीने आता त्वरित कारवाई करून सर्व लाभार्थ्यांच्या खात्यात निधी जमा करणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांना लवकरात लवकर घरबांधणी सुरू करता येईल. प्रशासनाने या योजनेंची प्रभावी अंमलबजावणी करून लाभार्थ्यांचा विश्वास संपादन करावा, अशी अपेक्षा आहे. यासाठी प्रशासकीय यंत्रणेने अधिक पारदर्शकता आणि गतिमानता दाखवणे गरजेचे आहे, जेणेकरून कोणत्याही लाभार्थ्याला अनावश्यक विलंबाचा सामना करावा लागू नये.

# टेंभुर्णीतील अवैध धंद्यांवर कारवाईची 'विद्रोही ब्ल्यू पँथर'ची मागणी; आंदोलनाचा इशारा

**जालना । प्रतिनिधी** - जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी शहरात खुलेआम सुरू असलेल्या अवैध धंद्यांना तत्काळ आळा घालण्याची मागणी विद्रोही ब्ल्यू पँथर संघटनेने केली आहे. दारू, वाळू, सट्टा, आणि जुगाराचा शहरात सुळसुळाट झाल्याचा आरोप संघटनेने केला आहे, ज्यामुळे गोरगरिबांचे संसार उद्ध्वस्त होत असून विद्यार्थीही या व्यसनाच्या आहारी जात असल्याचे म्हटले आहे.

संघटनेने म्हटले आहे की, टेंभुर्णी शहराच्या हद्दीत, वरच्या बस स्टँडपासून खालच्या बस स्टँडपर्यंतच्या गल्लीबोळात आणि सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीत सट्टा, मटका आणि जुगाराचे अड्डे सुरू आहेत. तसेच, अवैध वाळू उपसा आणि शासनमान्य देशी दारूच्या दुकानातून खेड्यांमध्ये घरपोच होणारे देशी दारूचे बॉक्सचे धंदे तत्काळ बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे.



या गंभीर समस्येकडे जिल्हा पोलीस अधीक्षक, जालना आणि सहायक पोलीस निरीक्षक, टेंभुर्णी यांचे लक्ष वेधण्यासाठी विद्रोही ब्ल्यू पँथर संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे. जर हे अवैध धंदे तात्काळ बंद केले नाहीत, तर संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी संघटनेचे नेते दीपक शिंदे, पवन जाधव, सुनील ससाणे, योगेश जाधव, दीपक जाधव, युवराज कांबळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ. साबू यांनी रोटरी प्रांताला नव्या उंचीवर पोहोचविले - मोहन पलेशा

## उत्कृष्ट कार्य करणारे प्रांतातील रोटरीचे पदाधिकारी, क्लबवर पुरस्कारांचा वर्षाव

**जालना । प्रतिनिधी** - रोटरीच्या इतिहासात जालन्याला प्रथमच डॉ. सुरेश साबू यांच्या रूपाने प्रांतपाल पदाची संधी मिळाली आणि त्यांनी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याबरोबरच सदस्यवृद्धी, ग्लोबल ग्रँट, पब्लिक इमेज याकडे विशेष लक्ष देऊन प्रांताला नव्या उंचीवर पोहोचविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यामुळे त्यांचा कार्यकाळ कायमस्वरूपी सर्वांच्या स्मरणात राहील, असे गौरवोउद्गार पुणे येथील प्रख्यात वक्ते तथा माझी प्रांतपाल मोहन पलेशा यांनी येथे बोलताना काढले.

रोटरी प्रांत ३१३२ चे मावळते प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्यावतीने रविवार, दि. ३ ऑगस्ट रोजी मंठा रोडवरील हर्षवर्धन पॅलेसमध्ये आयोजित विजयोत्सव पुरस्कार प्रदान सोहळ्यात प्रमुख पाहुणे ते बोलत होते. व्यासपीठावर नूतन प्रांतपाल सुधीर लातूरे, संगीता लातूरे, डॉ. सुरेश साबू, निर्मलादेवी साबू, नियोजित प्रांतपाल क्षितिज झावरे, मधुरा झावरे, जयेशभाई पटेल, पारुल पटेल आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ. सुरेश साबू म्हणाले की, ६५ वर्षात झाल्याला प्रथमच प्रांतपाल पद मिळाल्याने या पदाला न्याय देण्यासाठी मोठी जबाबदारी होती. जालना रोटरी परिवारासह प्रांतातील सर्वच उपलब्ध उत्कृष्ट कामगिरी केली. सेवा प्रकल्प, दहा नवीन क्लबची स्थापना, ग्लोबल ग्रँट, १३९ इंटरॅक्ट क्लब, रोटरी फाउंडेशनला मिळवून दिलेली भरभरून देणगी या सर्व बाबींमुळे उत्कृष्ट काम झाल्याचे समाधान आहे. मात्र यासाठी सर्वच उपलब्ध केलेल्या उल्लेखनीय कामांकरिता त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी प्रथमच जालन्यात विजयोत्सव आयोजित करण्यात आला. सर्वच क्लबचे कार्य उत्कृष्ट असल्याने पुरस्कारासाठी त्यांच्या कार्याचे परीक्षण करताना तीन आठवडे



मोठी कसरत लागली. कारण प्रचंड स्पर्धा होती. सर्वांच्या सहकार्याने कार्यकाळात चांगले काम करता आल्याचे आत्मिक समाधान आहे, असे ते म्हणाले.

याप्रसंगी ज्येष्ठ रोटरीयन अरुण अग्रवाल यांना रोटरीचा सर्वोच्च सर्विस अबाउ सेल्फ तर उद्योजक सुनील गोयल यांना मानव सेवातील उत्कृष्ट कार्याचा जागतिक स्तरावरील पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच रोटरीचे प्रमुख देणगीदार घनश्याम गोयल, समीर अग्रवाल व सौ वर्षा अग्रवाल, राजेंद्र भारुका व दिनेश भारुका, यश अनिल गोयल व गोविंद गोयल, संजय अग्रवाल यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पार पडलेल्या पुरस्कार प्रदान कार्यक्रमात प्रांतातील विविध क्लबवर पुरस्कारांचा वर्षाव झाला. उत्कृष्ट प्रांत सचिव म्हणून डॉ. सुमित्रा गादिया, उत्कृष्ट डिस्ट्रिक्ट ऑफिसर म्हणून डॉ. राजेश सेठीया, प्रांतातील उत्कृष्ट क्लब म्हणून अंबाजोगाई क्लब, उत्कृष्ट क्लब अध्यक्ष म्हणून सोलापूर क्लबचे सुनील माहेश्वरी, उत्कृष्ट क्लब सचिव म्हणून रोटरी क्लब जालना रेनबोचे सचिव गौरव करवा यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला रोटरीचे संस्थापक सदस्य श्रीनिवास भक्कड, रामकिशन मुंदडा, फुलचंद भक्कड, प्रांतातील अनेक माजी प्रांतपाल, जालना रोटरी परिवारासह ११ जिल्ह्यातील रोटरीचे पदाधिकारी हजारोच्या संख्येने उपस्थित होते. दिवसभर चाललेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सोनाली सोनी, डॉ. सुजाता नानावटी, डॉ. स्वप्निल बडजाते, वीरेंद्र देशपांडे, विवेक मणियार यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. नितीन खंडेलवाल यांनी मानले.

# परतूरचे अर्जुन पाडेवार यांच्या सामाजिक कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल!

## श्रीलंकेत बौद्ध भिकखू संघाने व्यक्त केली मंगल कामना

**परतूर । प्रतिनिधी** - येथील सामाजिक कार्यकर्ते अर्जुन दादाराव पाडेवार यांचे सामाजिक कार्य आता सातासमुद्रापार पोहोचले असून श्रीलंकेतील बौद्ध भिक्खहू संघाने पाडेवार यांच्याप्रति मंगल कामना व्यक्त केल्याचा संदेश नुकताच प्रसारित केला आहे.

जालना जिल्ह्यातील परतुर शहरातील सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांच्या सामाजिक कार्याची दखल पुज्यनिय भिक्खु संघाने थेट श्रीलंका देशातुन घेत त्यांच्या साठी मंगलकामना केली,पूज्यनीय भिक्खू निर्वाण थेरो,भदंत शिकबोधी थेरो व पुज्यनिय भिक्खुसंघाने थेट श्रीलंका अनुराधापुर येथुन पांडेवार यांना आशीर्वाद दिले, संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुध्द यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पावनभुमीत पाडेवार यांच्या सामाजिक कार्यप्रती मंगलकामना केली.आयुष्यातील गोर गरीब दलित पिडीत वंचित बहुजन कष्टकरी कामगारांच्या न्याय हक्कांसाठी पुकारलेल्या लढ्याच्या अनुषंगाने समस्त पूज्यनीय भिक्खु संघाच्या वतीने थेट तथागत भगवान गौतम बुध्दांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पावनभुमी जिथे सम्यक संबुद्धाला बोधित्व प्राप्त झाले अशा परम पूज्यनीय स्पुर्ती स्थळाहुन पाडेवार यांच्या कार्यासाठी मंगलकामना करून अमूल्य आशीर्वाद दिले

आयुष्यात पुकारलेल्या गोर गरीब दलित वंचित पिडीत कष्टकरी बहुजन कामगार समाज बांधवांच्या न्याय हक्कासाठीच्या पाडेवार हे तत्परतेने पुढाकार घेतात म्हणून त्यांना सुख शांती ऊर्जा प्राप्त होवो म्हणून आशा प्रकारे मंगल मैत्री त्यांच्या कार्यापरीत भिक्खु यांच्या वतीने चिवरदान करून अष्टपुरस्कार दान करून दिपाणे, धुपाने आशिर्वाद दिला,

परतूर शहर परिसरात अर्जुन पाडेवार यांचे सामाजिक कार्य सर्वश्रुत आहे. तहसील कार्यालयासह, पंचायत समिती, नगर परिषद, सरकारी दवाखाना, पोलीस स्टेशन,वीज वितरण कंपनी, विविध बँका यासह इतरही अनेक कार्यालये, शासकीय, निमशासकीय कार्यालयाशी निगडित जनतेची कामे ते प्राधान्याने करतात. त्यांना बालपनासूनच समाजसेवेची आवड आहे. पाडेवार यांनी आतापर्यंत अनेक वृद्ध, विधवा, निराधार मंडळीना त्यांच्या हक्काची पगार सुरु केली आहे. अनेकांना शिधापत्रिका मिळवून दिल्या आहेत. दुर्धर आजाराने ग्रस्त व्यक्तींना वैद्यकीय मदत योजनेतून आर्थिक मदत मिळवून दिली आहे. त्यामुळे अनेकांचे प्राण वाचले आहेत. मागे एकदा आंबेडकरनगर असलेल्या तळ्यातील दुर्गंधीमुळे या भागातील नागरिकांना घरात थांबणे दुरापास्त झाले होते. यावेळी पाडेवार यांनी तातडीने ही समस्या संबंधित अधिकाऱ्यांना कळवून समस्या मार्गी लावली होती. याप्रसंगी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी स्वतः परतूरला येऊन तळ्यातील पाण्याची पाहणी करून नमुने तपासणीसाठी घेतले होते. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वतीने मागे खाते उघडण्याची मोहीम हाती घेण्यात आली होती.या मोहिमेला. प्रतिसाद देत पाडेवार यांनी सभागृहात एका विशेष शिबिराचे आयोजन करत एकाच दिवशी ३५० सुकन्या समृद्धी योजनेची खाती उघडली.अनेकवेळा रोगनिदान शिबीरे घेतली.

शहरात निर्माण झालेल्या नागरी समस्यांसाठी लोक पाडेवार यांनाच प्राधान्य देत समस्या सांगतात. आणि त्यांची समस्या सुटते असा नागरिकांचा अनुभव आहे. आतापर्यंत पाडेवार यांनी रस्त्यावरील खड्डे, तुंबलेल्या नाल्या, फुटलेले ढापे, बंद पथदिवे, अनियमित पाणीपुरवठा ही व अशी कितीतरी कामे मार्गी. लावली आहेत.

# जाफ्राबाद भोकरदन रस्त्यावर जानेफळ फाटा येथे अपघातात एक ठार दोन जखमी

**विशाल देशमुख**

**जाफराबाद** - तालुक्यातील जाफराबाद भोकरदन रस्त्यावरील जानेफळ पंडित फाट्याजवळ दोन दुचाकीचा अपघात होऊन एक दुचाकीस्वार जाफराबाद कडून येणाऱ्या अज्ञात मेक्जिमो गाडी खाली येऊन ठार झाल्याचे घटना रविवार दि.०३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी नऊ साडेनऊ वाजे दरम्यान घडली आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की जानेफळ पंडित येथील गणपत रामकृष्ण शिनगारे वय ६० वर्ष व त्यांची पत्नी हे दुचाकीवरून काही कामानिमित भोकरदन तालुक्यातील कोळेगावकडे जात असताना जानेफळ पंडित फाट्याजवळ माहो-याकडून भरधाव येणाऱ्या सय्यद रफिक रा. सिल्लोड यांची दुचाकी (क्र एम एच २० बी एक्स ९४४२) या दुचाकी स्वाराणे जबर धडक दिल्याने शिनगारे यांच्या दुचाकी ( एम एच २१ बी एम २४७३) वरील त्याची पत्नी जानेफळ साइड पडल्या तर गणपत शिनगारे हे रस्त्यावर पडले तितक्यात जाफराबाद कडून येणाऱ्या अज्ञात मेक्जिमो गाडीने गणपत शिनगारे यांना चिरडून पळ काढला या अपघातात गणपत शिनगारे यांचे दुर्दैवी जागीच निधन झाले तर दुचाकीवरील सय्यद रफिक रा. सिल्लोड व गणपत शिनगारे यांची पत्नी गंभीर जखमी झाले आहे जखमींना पुढील उपचारासाठी दवाखान्यात हलवण्या आले. मयत गणपत शिनगारे यांना जाफराबाद येथील ग्रामीण रुग्णालयात आणून शव विच्छेदन करून त्यांचा जानेफळ गावी दुपारी ३ वाजता अंतिम संस्कार करण्यात आले. स्व. गणपत शिनगारे यांच्या पश्चात एक एक मुलगा एक मुलगी पत्नी असा खुप मोठा परिवार आहे. तर या अपघातानंतर अज्ञात मेक्जिमो गाडी चालक फरार झाला आहे. या घटनेचा पुढील तपास जाफराबाद पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक वासुदेव पवार हे करीत आहे.

# शिवक्षेत्र सूर्यकांत ईश्वर महादेव मंदिर येथे निसर्ग सहल



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - शिवक्षेञ सुर्यकांतेश्वर महादेव मंदीर सोलगव्हाण, येथे राजर्षी छञपती शाहू महाराज विद्यालय डुकरी पिंपरी,ता.जि.जालना या शाळेने सुर्यकांतेश्वर महादेव मंदीर शिव क्षेञ सोलगव्हाण,ता.जि.जालना.श्रावण सोमवार निमित्त हर हर महादेव च्या घोषणा देत मंदिरा कडे प्रस्थान करून नैसर्गिक दिंडी ची सहल काढली.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सी.जी.वाघमारे यांनी श्रावण महिण्याचे महत्व विद्यार्थ्यांना सांगीतले ते बोलताना म्हणाले शुक्रवार २५ जुलैपासून आपल्या सर्वांचा आवडता आणि सर्व सणउत्सवांचा राजा श्रावण महिना(२०२५) सुरू झाला आहे. हा श्रावण केवळ आपल्यालाच नाही, तर भगवान शंकरालाही प्रिय आहे. म्हणून या मासात शिवपूजेला अधिक महत्त्व दिले गेले आहे. तसेच चातुर्मासात भगवान विष्णू विश्रांती करत असताना त्यांचा कार्यभार महादेव सांभाळतात. त्यांच्याप्रती कृतज्ञता दर्शवण्यासाठी देखील शिवपूजा केली जाते. शिवशंकर हे अनेकांचे कुलदैवत आहे. सदाशिव, सांब, महादेव, महेश, मंगेश, शंकर, गिरिजापती, पार्वतीपती अशी अनेक नावे त्यांना आहेत. भारतात बारा ज्योतिर्लिंगे तर प्रसिद्ध आहेच, शिवाचे भक्त अर्थात शैव सांप्रदायिक केवळ श्रावणातच नाही, तर वर्षभर शिवपूजा करतात.


यावेळी उपस्थित शाळेचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी श्रीमती एस.आर.कुलकर्णी,डी. एन.सोनकांबळे, पी.पी.नागरे, एल.बी.जाधव, आर. एस.ठाकरे, एस.बी.राऊत, श्रीमती.एम.ए.खरात व विद्यार्थी उपस्थित होते.!

# ऑगस्ट ते १५ ऑगस्ट कालावधीत अवयवदान पंधरवडा

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हयामध्ये मानवी अवयवाचे अवयवदान पंधरवडा दि.३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीमध्ये साजरा करण्यांत येत आहे. मृत्यू पश्चात किंवा ब्रेन डेथ (मेंदु मृत) झाल्यावर अवयवाचे दान करता येते. उदा. नेत्रदान, यकृत, हदय, किडनी, फुपुफसे, त्वचा, हाडे व आतडी इ.अवयवाचे दान करता येते. आपण मानवी अवयवाचे दान करु शकतो तसेच अवयव दानाचे महत्व ही संकल्पना जनसामान्य पर्यंत पोहचावी या उद्देशाने अवयव दान पंधरवडा साजरा करण्यांत येत आहे. आवाहन : अवयव दान करा जीवन वाचवा.

# रक्षाबंधन बहिण-भावांचे पवित्र नाते; या निमित्ताने व्हावे वृक्षारोपण

रक्षाबंधन हा सण बहिण-भावाचा सण म्हणून राज्यासह देशात ओळखला जातो.राखीचा धागा साधासुधा नसुन अतुट बंधन आहे.भारतात सर्वच जातीधर्माचे लोक रक्षाबंधन मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा करतात.यात भावाने बहिणीला दिलेले वचन अत्यंत महत्त्वाचे असते. पंचागानुसार श्रावण महिन्यातील म्हणजे राखी पौर्णिमा याला नारळी पौर्णिमा सुध्दा म्हणतात.हा सण भारतीय संस्कृतीच्या सणांमध्ये प्रमुख सण आहे.यामुळे बहिण-भावात उत्साहाचे वातावरण निर्माण होते. भारतात संपूर्ण राज्यात राखी पौर्णिमा वेगवेगळ्या पध्दतीने साजरी केली जाते.उत्तर भारतात कजरी पौर्णिमा,पश्चिम भारतामध्येनारळी पौर्णिमाया नावाने हा सण साजरा केला जातो.पुराणात सांगितल्याप्रमाणे श्रावण पौर्णिमेला मोठ्यांचे आशीर्वाद पवित्र मानल्या जाते. पुर्वी मध्ययुगीन काळात भारतामध्ये बाहेरील आक्रमणापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येत असे. महाभारतात सुध्दा बहिणभावाचे अतुट बंधन दिसून येते. श्रीकृष्णाच्या हाताच्या बोटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहत होते त्यावेळी पांडवांची पत्नी द्रौपदीने आपल्या साडीची किनार फाडून श्रीकृष्णाच्या बोटाला बांधली आणि त्यांचा रक्तस्राव थांबवला.तेव्हापासुन श्रीकृष्णाने



द्रौपदीचे रक्षण करण्याचा संकल्प केला आणि आजीवन द्रौपदीचा भाऊ म्हणून तिचे रक्षण केले. म्हणजेच रक्षाबंधनाची परंपरा दैवी काळापासून तर आजपर्यंत आजतागायत सुरू आहे.यावरून हेच लक्षात येते की बहिणीच्या रक्षणासाठी भाऊ काहीही करायला तयार असतो.अशा इतिहासात अनेक गोष्टी आपल्याला पहायला मिळतात. चित्तोढगडची राणी कर्मावती हिने बहादुरशहा पासून आपली रक्षा करण्यासाठी मुघल बादशहा हुमायूला राखी बांधली होती.राखी बांधल्यानंतर राजा हुमायूने राणी कर्मावतीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली असे सांगण्यात येते.यावरून स्पष्ट होते की भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी जान जाये पर वचन न जायेअशी भूमिका बहिणीबद्दल भावांमध्ये दिसून येते. संपूर्ण भारतात रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. रक्षाबंधन म्हणजे बहीण -भावाच्या अतुट बंधन.म्हणजेच बहिण-भावाच्या नात्याचा सुवर्ण महोत्सव. कारण यामुळे दोघांचेही प्रेम एकत्र येऊन भाऊ बहीणीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो व कठीण प्रसंगी धावुन येण्याचे वचन देतो.यामुळे बहिण -भावाचे प्रेम अफाट असल्याचे दिसून येते.सध्या बहिण -भावाप्रमाणे आज वृक्षांना आपल्या बंधनात बांधण्याची नितांत गरज आहे. कारण वृक्ष रहाली तर जमीन (पृथ्वी) राहील,पृथ्वी शाबूत रहाली,तर मानव व संपूर्ण जीवजंतू आणि सृष्टी सुरक्षित राहील.कारण दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे पृथ्वी डगमगायला लागली आहे यामुळे भूस्खलन, भूकंप, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक,अती थंडी,अती उष्णता,अती पाऊस अशाप्रकारच्या कधीच न घडलेल्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत याकरीता पृथ्वीला वाचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर असल्यामुळे जास्तीत जास्त वृक्षारोपण अती आवश्यक आहे.बहिणीने भावाला राखी अवश्य बांधावी. परंतु सोबतच एक वृक्ष भेट देऊन त्यांची जोपासना करण्याचे वचनसुध्दा घ्यावे.कारण दिवसेंदिवस हवामानात बदल होतांना दिसत आहे.यामुळे अनेक पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे व काही पशुपक्षी व वृक्ष लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.पुर्वी मुसळधार व संथ गतीने पाऊस यायचा. परंतु बदलत्या हवामानामुळे मुसळधार पाऊसाचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढल्याचे दिसून येते व यामुळे ढगफुटीचे व सुनामीचे प्रमाण सुध्दा वाढले आहे. यामुळे मानवी हानी,शेतीचे नुकसान, वित्तीय हानी,समुद्राच्या पातळीत वाढ, सुनामी,भुकंप, वादळ,विजकोसळने,अती उष्णता,अती थंडी ह्या संपूर्ण भयावह घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते. मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे येणाऱ्या संकटांशी सामना अवश्य करू शकतो. याकरीता रक्षाबंधनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला हवे.त्याचबरोबर बहिणीने भावाला किंवा भावाने बहिणीला काय मौल्यवान वस्तू भेट द्यायच्या आहेत त्या अवश्य द्याव्यात. परंतु बहिणीने भावाला व भावाने बहिणीला एक -एक वृक्ष भेट देऊन धर्तीमातेचे रक्षण करण्याचा संकल्प सर्वांनीच घेतला पाहिजे. यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल. येणारे पाऊसाचे पाणी जमिनीत मुरेल व पृथ्वीचे संतुलन सुरक्षित राहील, ग्लेशियर वितळणे थांबेल, वणव्याचे प्रमाण कमी होईल,भुकंपावर आळा बसेल, अशाप्रकारे निसर्गावर येणारे संकट वृक्षलागवडीमुळे हळूहळू कमी होण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल. वृक्षलागवड सांस्कृतिक, सामाजिक,सण उत्सव, राष्ट्रीय कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय कार्यक्रम अशा कोणत्याही मार्गाने होने अत्यंत गरजेचे आहे. कारण यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल व हवामानातील वाढता बदल यावर अंकुश लावण्यास सर्वांचा



हातभार कामी येईल. त्याचप्रमाणे निसर्ग प्रफुल्लित रहाला तर देशात पर्यटनाला सुध्दा मोठी चालना मिळेल. त्यामुळे रक्षाबंधनाचे औचित्य साधून बहिण-भावाने वृक्ष भेटीवर जास्तीत जास्त भर देण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सरकारने सुध्दा संपूर्ण सणांचे औचित्य साधून जास्तीत जास्त वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची गरज आहे.सरकारने राज्यात लाडकी बहिण योजना अंमलात आणली याचे मनापासून स्वागतच अशा प्रकारच्या योजना अंमलात आणल्यानंतर प्रत्येकांना सरकारने एक-एक वृक्ष भेट देऊन पर्यावरण वाचविण्याच्या बंधनात सहभागी केले पाहिजे.सोबतच संपूर्ण प्रशासकीय विभाग,शाळा-महाविद्यालये यांना या पवित्र दिनाच्या निमित्ताने वृक्षलागवडीसाठी सरकारने प्रोत्साहीत करून निसर्गाला वाचविले पाहिजे.नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# कुरेशी समाजाला शासकीय नोकरी द्यावी, शेतकऱ्यांकडून भाकड जनावरे सरकारने खरेदी करावीत

## राष्ट्रवादी काँग्रेसचे तय्यब देशमुख यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** कुरेशी समाजावरील कथित अत्याचार थांबवून त्यांना शासकीय नोकरीत सामावून घ्यावे, तसेच शेतकऱ्यांकडून भाकड गाई व वयस्कर बैल शासनाने खरेदी करावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) जालना शहर उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख यांनी उपमुख्यमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत हे निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, अनेक वर्षांपासून कुरेशी समाजावर अत्याचार होत आहेत आणि संपूर्ण महाराष्ट्रातील पोलीस याकडे बघ्याची भूमिका घेत आहेत. कुरेशी समाज आठवडी बाजारात नियमानुसार दाखल्याने भाकड गाई व वयस्कर बैल, म्हशी खरेदी करत असतानाही बजरंग दल, विश्व हिंदू परिषद संघटना आणि गोरक्षक संघटनांच्या नावाखाली इतर संघटनांकडून त्यांना नाहक त्रास दिला जात आहे. अनेक कुरेशी समाजाच्या व्यापाऱ्यांना देशात व राज्यात मारहाण करण्यात आली, तर काहींना जिवे मारण्यात आले. या त्रासामुळे कुरेशी समाज वैतागला असून, अनेक पोलीस ठाण्यात तक्रारी करूनही कोणतीही कारवाई झाली नाही.

या परिस्थितीमुळे महाराष्ट्र राज्यातील कुरेशी समाजाने आठवडी बाजारातून भाकड गाई व वयस्कर बैल, म्हशींची खरेदी-विक्री बंद केली आहे. यामुळे कुरेशी समाजाला कोणीही न्याय देण्याचा प्रयत्न करत नसल्याने त्यांच्यावर



उपासमारीची वेळ आली आहे, कारण त्यांचा पिढ्यानपिढ्या चालणारा व्यापार बंद पडला असून, त्यांना कोणीही मदतीला गेलेले नाही.

याचा परिणाम शेतकऱ्यांवरही झाला आहे. कुरेशी व्यापाऱ्यांनी खरेदी-विक्री बंद केल्यामुळे शेतकरी भाकड गाई व वयस्कर बैल विकून आपले उत्पन्न मिळवत होते, ते बंद झाले आहे. आता शेतकऱ्यांकडून कोणीही भाकड गाई व वयस्कर बैल विकत घेत नसल्याने तेही त्रस्त आहेत. निवेदनात असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे की, इतर सर्व राज्यांमध्ये भाकड गाई व वयस्कर बैल-म्हशींची खरेदी-विक्री चालू असताना, फक्त महाराष्ट्र राज्यातच बंदी का आहे?

देशमुख यांनी इशारा दिला आहे की, जर राज्य सरकारने शेतकरी आणि कुरेशी समाजाला न्याय दिला नाही, तर राज्यात शेतकरी आणि कुरेशी समाजावर उपासमारीची वेळ येईल आणि आत्महत्यांचे प्रमाणही वाढू शकते. २०१४ पासून गोरक्षक, बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषद संघटनांच्या नावाखाली काही लोक कुरेशी समाजाला त्रास देत आणि मारहाण करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. यावरून 'देशात व राज्यात कायदा कोणासाठी आहे? की बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, गोरक्षक यांना फक्त कुरेशी समाजाला मारण्यासाठी राज्य सरकारने आणि केंद्र सरकारने आदेश दिला आहे', अशी भीती कुरेशी समाजामध्ये व्यक्त केली जात असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

जर कुरेशी समाजाचा व्यापारी आठवडी बाजारातून भाकड गाई व वयस्कर बैल आणि म्हशी खरेदी करून जात असेल आणि शंका असल्यास पोलिसांनीच कारवाई केली पाहिजे, बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, गोरक्षक हे कसे काय पकडतात, असा प्रश्न कुरेशी समाज आणि शेतकऱ्यांकडून विचारला जात आहे.

यावर उपाय म्हणून, तय्यब बापू देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली आहे की, कुरेशी समाजाचा व्यापार पूर्वीसारखा सुरू करण्याची परवानगी द्यावी किंवा त्यांना शासकीय नोकरी द्यावी. तसेच, शेतकऱ्यांकडून भाकड गाई व वयस्कर बैल-म्हशी महाराष्ट्र सरकारने खरेदी करून शेतकरी आणि कुरेशी समाजाला न्याय द्यावा.

या निवेदनावेळी तय्यब बापू देशमुख यांच्यासह कैलास मगरे (सोशल मीडिया जिल्हा अध्यक्ष), आमेर सिद्दीकी (युवक शहर उपाध्यक्ष), अन्वर तांबोळी आदी उपस्थित होते.

# फटाका फोडणाऱ्या ७० बुलेटवर पोलीसांची कारवाई, सायलेन्सर जप्त



**जालना । प्रतिनिधी-** जालन्यातील वाहतूक पोलिसांनी फटाका सदृश आवाज काढणाऱ्या बुलेट मोटारसायकल्सवर धडक कारवाई केली आहे. शहरातील वर्दळीच्या ठिकाणी विशेष मोहीम राबवत तब्बल ७० बुलेट मोटारसायकल्स पकडण्यात आल्या असून, त्यांचे सायलेन्सर काढण्यात आले व ते जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे बेशिस्त वाहनचालकांना चाप बसणार असून, ध्वनी प्रदूषणाला आळा बसण्यास मदत होणार आहे.

शहरात गेल्या काही दिवसांपासून काही बुलेटस्वार विनाकारण मोठ्या आवाजात सायलेन्सर वापरून फटाक्यासारखे आवाज करत होते. यामुळे सामान्य नागरिक, विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना मोठा त्रास होत होता. तसेच, वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत होता. या वाढत्या तक्रारींची दखल घेत जालना वाहतूक पोलिसांनी ही विशेष मोहीम हाती घेतली.

या मोहिमेंतर्गत शहरातील प्रमुख चौकांमध्ये आणि वर्दळीच्या रस्त्यांवर नाकाबंदी करून बुलेट मोटारसायकल्सची तपासणी करण्यात आली. ज्या बुलेट मोटारसायकल्सचे सायलेन्सर बदलून आवाजाची मर्यादा ओलांडली होती, अशा ७० गाड्यांवर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी तात्काळ हे सायलेन्सर काढून जप्त केले.

या कारवाईमुळे शहरातील ध्वनी प्रदूषणात घट होण्यास मदत होईल, तसेच बेशिस्त वाहनचालकांमध्ये कायद्याचा धाक निर्माण होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वाहतूक पोलिसांनी नागरिकांना नियमांचे पालन करण्याचे आणि शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. अशी कारवाई भविष्यातही सुरूच राहील, असे वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.